महाराष्ट्र विधानपरिषद
पत्रक भाग दोन
गुरुवार, दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२६ / कार्तिक १४, १९४८ शके

१०५. लक्षवेधी सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की :-

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सोमवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०२६ पासून विधान भवन, नागपूर येथे सुरु होणाऱ्या सन २०२६ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनासाठी द्यावयाच्या म.वि.प. नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना पूर्णत: एम.ओ.आय.एस. (MOIS) या संगणक प्रणालीवर ऑनलाईन (ONLINE) पध्दतीने सोमवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२६ पासून सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

(२) महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये द्यावयाच्या लक्षवेधी सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबंधित असणे आवश्यक आहे. तसेच लक्षवेधी सूचनेचे प्रारूप १५० ते १७५ शब्दांचे असावे.

(३) लक्षवेधी सूचना **संपूर्णत: ऑनलाईन** (ONLINE) पध्दतीने स्वीकारण्यात येत असल्याने मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार ऑनलाईन (ONLINE) पध्दतीव्दारे प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांवरील सन्माननीय सदस्यांची नावे ग्राह्य धरण्यात येतील. ऑफलाईन (OFFLINE) पध्दतीव्दारे प्राप्त झालेल्या लक्षवेधी सूचनांवरील सन्माननीय सदस्यांची नावे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

(४) अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण ३ दिवस अगोदरचा दिवस हा ONLINE पध्दतीने लक्षवेधी सूचना स्विकारण्यासाठी अंतिम दिवस असेल.

(५) लक्षवेधी सूचना स्वीकृत करण्यासंबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा संपूर्ण अधिकार हा मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचाच राहील, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ०५ नोव्हेंबर, २०२६

डॉ.विलास आठवले,
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद

प्रती :-

(१) महाराष्ट्र विधानरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
(३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय
(४) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
(५) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
(६) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
(७) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
(८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
(९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालय
(१०) संगणक कक्ष **(WEBSITE)**
(११) एम.के.सी.एल. कक्ष **(MKCL)**